**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# श्री ठाकूर व श्री सुरकार यांचा कुलगुरुंचे हस्ते सेवानिवृत्तीप्रसंगी सत्कार
# विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न

अमरावती.

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते वित्त विभागाचे सहाय्यक अधीक्षक श्री विजयसिंह ठाकूर आणि आस्थापना विभागाचे कनिष्ठ सहाय्यक श्री प्रल्हाद सुरकार यांचा सेवानिवृत्तीप्रसंगी शॉल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. सौ. ठाकूर व सौ. सुरकार यांचा सत्कार साडीचोळी व चांदीचा करंडा देवून सौ. अर्चना किरकोळ यांनी विद्यापीठाच्यावतीने केला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून व्य.प. सदस्य तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण, अमरावती विभागाचे डॉ.दि.व्यं. जाधव, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, वि. व ले. अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड, कर्मचारी संघाध्यक्ष श्री अजय देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उभयता सत्कारमूर्ती श्री विजयसिंह ठाकूर, सौ. ठाकूर, श्री प्रल्हाद सुरकार, सौ. सुरकार उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, विद्यापीठात कार्यरत सर्वच कर्मचारी मनापासून कार्य करणारे आहेत. आपल्या सेवेतील प्रसंगांचं स्मरण व्हावे, संस्थेच्या विकासामध्ये दिलेल्या योगदानाचा उहापोह व्हावा, या उद्देशाने कर्तव्यपूर्ती सोहळा वेगळेपण दर्शवितो. श्री विजयसिंह ठाकूर व श्री प्रल्हाद सुरकार यांनी विद्यापीठाला दिलेली सेवा वाखणण्याजोगी आहे. कार्यक्षम कर्मचारी म्हणून त्यांचा नावलौकिक राहीला आहे. त्यांच्या कार्यामुळे विद्यापीठाच्या कार्याला बळ मिळालं. ही सर्व मनापासून काम करणारी व योगदान देणारी मंडळी असल्याचेही ते म्हणाले.

प्रमुख अतिथी तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ.दि.व्यं. जाधव म्हणाले, संत गाडगे बाबांच्या शिकवणुकीनुसार हे विद्यापीठ वाटचाल करीत असतांना येथील कर्मचारी दुसऱ्यांच्या स्वप्नांसाठी कार्य करणारे आहेत. मानवी मूल्यांची जोपासना या विद्यापीठाने केली आहे. विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल व्हावे, यासाठी विद्यापीठातील कर्मचारी सातत्याने कार्यरत आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याबाबत विद्यापीठाने नियम तयार केले असल्यामुळे पोकळी भरुन काढण्याचा प्रयत्न होत असल्याचे ते म्हणाले. सेवाकाळात सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य व मदत मिळाली. सर्वांनी सौजन्याची आणि प्रेमाची वागणूक दिली, त्यामुळे अधिक कार्यक्षमतेने आणि जबाबदारीने सेवाकाळात काम करीत आल्याची भावना सत्कारमूर्ती कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्या.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी प्रास्ताविक भाषण करुन पाहुण्यांचे शब्दसुमनाने स्वागत केले व सत्कारमूर्तींना रजा रोखीकरणाचा धनादेश प्रदान केला. नियंत्रण अधिकारी वि. व ले. अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले व उपकुलसचिव श्री प्रवीण राठोड यांनी, तर संघटनेच्यावतीने कर्मचारी संघाध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री दिपक काळे यांनी पतसंस्थेतर्फे उभयतांचा सत्कार करुन कल्याण निधी व भागभांडवल राशीचा धनादेश प्रदान केला. संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, विद्यापीठाचे विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी व सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

---

प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी　　　　　　　　　　　　　　　दि. ०२/०६/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी